# गळतीची पाने

प्रकाशित: **महाकेसरी दिवाळी अंक २०१२**

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

**© पुनरारंभ**

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# गळतीची पाने

गोपाळराव व निर्मलाताई दोघे साठी ओलांडलेले ज्येष्ठ नागरिक. नेहमी प्रमाणे संध्याकाळचा फेर फटका मारून देवदर्शन झाल्यावर समोरच्या बागेत झाडाखाली बाकावर नितनियमाप्रमाणे घडीभर निवांत बसले. ते बसलेल्या जागेवरून बागेतील सर्व त्यांना दिसत होते. समोर सुंदर हिरवागार मऊ  गवताचा लॉन पसरला होता. रंगीबेरंगी फुलांचे ताटवे बहरले होते. फुलपाखरे स्वच्छंद विहरत होती. झाडावर पक्ष्यांचा चिवचिवाट चालू होता. बाहेर गेट जवळ वडा पाव, भेळपुरी, पाणी पुरी व फास्ट फूडची दुकाने थाटली होती. लॉनवर काही कुटुंबे हसत खिदळत आपसात गप्पा गोष्टी करित होती. काही कुमार वयातील मुले मुली लॉन वर क्रिकेट, फूटबॉल, टेनिस खेळत होती. त्यांचे पालकही त्यांच्या खेळण्यात सामिल होउन खेळाचा आनंद घेत होती. काही तरूण तरूणी घोळक्याने बसली होती तर प्रेमी युगुले व काही जोडपी वडा पाव, भेळीचा आस्वाद घेत बागेच्या कडेला झाडीमध्ये आपसात दंग झाली होती. बागेच्या एका बाजूला बालकांसाठी छोटया बालोद्यान मध्ये घसरगुंडी, झोपाळा, सिसॉ सारख्या खेळण्यावर लहान मुले खेळाचा आनंद घेत होती. त्यांचे पालकही बालकांचे कोडकौतुक करित त्यांना कसे खेळायचे याचे मार्गदर्शन करित होती. गोपाळराव व निर्मला ताई बसलेल्या बाकाच्या भोवती पिकलेल्या पानांचा सडा पडला होता. एकंदरित संध्याकाळचे प्रसन्न शांत व रम्य वातावरण होते.

गोपाळराव व निर्मला ताई आपसात बोलत असतांना “अहो गोपाळराव अहो निर्मलाताई ” अशी हाक त्यांच्या कानी आली.

उभयतांनी आपणास कोणी हाक मारित असल्याने इकडे तिकडे चैाफेर नजर टाकली पण कोणीच दिसेना. क्वचित प्रसंगी भास झाला असेल असे म्हणत दुर्लक्ष करित परत दोघे आपल्या गप्पात दंगले. थोडया वेळाने परत तीच हाक “अहो गोपाळराव अहो निर्मलाताई ” त्यांच्या कानी आली. गोपाळराव आपल्या जागेवरून उठून उभे राहिले व इकडे तिकडे पाहू लागले. पण कोणीच दिसेना.

“ अहो गोपाळराव मी येथे खाली आहे, तुमच्या पायाशी . इकडे खाली बघा” . गोपाळरावांनी मिळालेल्या सूचनेप्रमाणे स्वतःच्या पायाकडे पाहिले . पायाशी झाडाची अर्धवट वाळलेली व गळून पडलेल्या पानाशिवाय काहीच दिसेना .

“ होय, होय मीच बोलतोय ” एका पानातून आवाज आला .

“ मला उचला . ” दूसरी सूचना झाली . गोपाळराव व निर्मलाताई गोंधळले घाबरले . काही अवचित प्रकार तर नाहीना अशी शंका त्यांच्या मनी आली .

“अहो घाबरू नका . मी पर्ण बोलतोय . भूत पिशाच वगैरे काही नाही . उचला मला ” परत आज्ञा झाली .

गोपाळरावांनी मोठया हिकमतीने, धीराने व घाबरतच एक पान उचलले .

“ अहो, ते नाही . त्याच्या बाजूचे . हिरव्या देठाचे, किंचित पिवळसर रंगाचे . ते उचला .” निर्देश वजा सूचना झाली .

गोपाळरावांनी सूचनेप्रमाणे हातातले पान खाली टाकत त्याच्या शेजारचे पान उचलले .

“ अहो ते पण राहू द्यात . उचला ते . द्या निर्मलाताईच्या हातात . आणि आता हे पान तुमच्या हातात ठेवा व बसा आपल्या जागेवर ” . अशी सूचना मिळाली .

सुरवातीला झाडापासून अलग झालेले, गळालेले व थोडेसे वाळलेले पान बोलत असल्याचे पाहून निर्मलाताई जाम घाबरल्या . क्षण भर उभयतांना नवल व कुतुहल वाटले .

“अहो निर्मलाताई अशा घाबरू नका . नवल करू नका अथवा कुतुहलाने पण बघू नका . घाबरण्याचे तर मुळीच कारण नाही . इथे काही जादूटोणा नाही कींवा अंगारा धूपाराचा प्रकार नाही . प्रसन्न चित्ताने व शांत मनाने दोघे बसा . आपण थोडयाशा गप्पा मारूया !” पान म्हणाले .

“ नमस्कार गोपाळराव, नमस्कार ताई ” पानाने उभयतांना नमस्कार केला .

" नमस्कार" असे म्हणत उभयतांनी त्याचा स्विकार केला.

" माफ करा, सुरवातीला मी तुम्हा उभयतांना नावाने हाका मारल्यात याचा तुम्हाला राग तर आला नाही ना? सारखे तुम्हाला नावाने हाक मारण्यापेक्षा तुम्हाला दादा आणि ताई संबोधले तर तुमची हरकत तर नाही ना ? " पर्णाने विनयशीलतेने विचारले.

"नाही, नाही, मुळीच नाही. काही हरकत नाही." गोपाळराव व निर्मलाताई उभयतांनी संमती दिली.

" अरे पण तु कोण आम्हाला कसे ओळखतो?" निर्मलाताईंनी धीराने प्रश्न केला.

" आमची ओळख सांगायची तर आम्ही पण तुमच्या सारखेच समवयस्क समदुःखी. माझे नाव पर्ण व तुमच्या हातातील माझा मित्र पन्नाा. आम्ही याच झाडावर जन्मलो. आमचा रहिवास तुमच्या मागील झाडावर होता. आता वयपरत्वे पान गळतीमुळे गळून झाडापासून अलग झालो आहोत. हीच आमची ओळख." पर्ण आपली ओळख करून देत म्हणाला.

" तुम्ही नित नियमित या बागेत फिरावयास येतात. येथेच बसतात. कधी तुमच्या समवेत तुमचे स्नेही मित्र असतात ते तुम्हाला नावाने हाक मारतात ते माझ्या लक्षात राहिले. म्हणून मला तुमची नावे समजली." पर्ण खुलासा करित म्हणाला.

" असे होय. पान गळती झाली तरी तुझी स्मरणशक्ती चांगली दिसते रे." त्याच्या स्मरण शक्तीला दाद देत व त्याची दखल घेत निर्मलताई व गोपाळराव म्हणाले.

"केलेल्या कौतुकासाठी धन्यवाद" पर्ण म्हणाला.

"दादा, ताई, मी आजपर्यंत तुमच्याशी संवाद साधण्याचा बरेच वेळा प्रयत्न केला पण मी झाडावर उंचावर असल्याने तुमच्या पर्यंत माझा आवाज पोहचतच नव्हता. पान गळ म्हणजे आमचे उतारवय. पानगळी मुळे मी खाली आलो व आता या उतारवयात तुमच्याशी संवाद साधण्याचा योग आला बघा. " पर्ण लीनतेने म्हणाला.

आतापर्यंतच्या संवादामुळे दादा, ताई, पर्ण व पन्ना यांच्यात मैत्रीचे नाते निर्माण झाले होते. नकळत एकमेका प्रति सहानुभुति व आपसी प्रेम निर्माण झाले होते. सर्वजण दिलखुलास गप्पा मरित होते.

एवढयांत पर्णाच्या कानी "ऊं ४ ऊं ४ ऊं ४" असा दुःखदायक वेदना कारक आवाज आला. त्याचे लक्ष अचानक निर्मलाताईंच्या हाताकडे गेले. पाहतो तर काय निर्मलताई आपल्या हातातील पन्नाच्या देठास आपला अंगठा व तर्जनी मध्ये धरून बोलता बोलता चाळा करित सहजपणे कधी उजवीकडे तर कधी डावीकडे गोल फिरवित होत्या.

तो एकदम ओरडत म्हणाला "अहो ताई, अहो ताई, थांबा जरा त्या पन्नास असे गोल गोल फिरवू नका. तो पण तुमच्या सारखाच वयस्कर आहे हो. त्याला चक्कर येतेय म्हणून तो "ऊं ४ ऊं ४ ऊं ४" असा ओरडतोय हो. अहो, या वयात त्याला असे गोल गोल फिरणे सहन होत नाही हो. "

निर्मलाताईची चूक त्यांच्या लक्षात आली. त्यांनी तावडतोब पर्ण व पन्नाची माफी मागीत पन्नास फिरविणे बंद केले व म्हणाल्या " अरे हो, चुकलेच हो माझे. माफ करा मला."

पन्ना थोडा थिर स्थावर झाल्याचे पाहून, आपसातील संवाद पढे चालू ठेवित पर्ण म्हणाला, "दादा तुम्ही व आम्ही समवयस्क, समदुःखी. दोघांनी आपल्या आयुष्यात बरेच काही भोगले, सोसले, अनुभवले, पाहिले. तुमच्या व आमच्या उतार वयात एक साम्य आहे, एक साधर्म्य आहे. या उतार वयात तुमच्या आमच्या मनात काही सल आहेत, काही कटु गोड आठवणी आहेत. तुमची हरकत नसेल तर त्यातील काही सामाईक अशी दुःखे, मनातील सल व आठवणी एकमेकाशी मनमोकळे बोलून आपली सुख दुःखे शेअर करण्याचा मानस आहे." पर्णाने प्रस्ताव मांडला.

" काही हरकत नाही. पण आपल्यात साम्य आहे, साधर्म्य आहे म्हणतोस, ते कसे काय रे ?" गोपाळरावांनी प्रश्न उपस्थित केला.

पर्ण बोलता झाला. "दादा आमचा जन्म याच झाडावर, याच बागेत झाला. ज्यावेळी पालवीचा अंकूर फूटला त्यावेळी या वृक्षाला, संगोपन व जोपासना करणाऱ्या माळी दादाला, एवढेच नव्हे तर येथे येणाऱ्या सर्व लहान थोरांना आनंद झाला. जो तो माझ्याकडे आनंदाने बोट दाखवित म्हणत असे "बघा झाडाला कशी छान पालवी फुटली". त्यावेळी आम्हाला खूप आनंद झाला.

इतका की आम्हाला आकाश ठेंगणे वाटू लागले. बघता बघता सर्व झाड कोवळया पालवीने भरून गेले. झाडाला शोभा आली. बाग बहरली. आमची कोवळी कांती बघून येणा-या जाणा-याची मने सुखावली. बाल वयात पावसाळयाच्या दिवसात पावसाच्या रिम झिम सरी अंगावर घेत, हिवळयात सकाळच्या कोवळया उन्हात मुक्तपणे नाहात, उन, वारा, पाउस, थंडी यांचेशी मैत्री केली. वा-याच्या झुळके बरोबर सळसळ करित नाचलो. गाणी गायली. थोडे मोठे झाल्यावर हिरव्यागार रंगानी सर्वांना नेत्रसुख दिले. मुसळधार पावसाचे थेंब झेलत, उन्हाचा कडाका सहन करित झाडाखाली आश्रयास आलेल्या प्रत्येक पांथस्थांला, भले तो गरिब असो अथवा श्रीमंत असो, लहान असो अथवा मोठा असो सर्वांना कोणताही भेदभाव न करता आश्रय दिला. एवढेच नव्हे तर या झाडाला लागलेली फळे, फुले पण ज्याला वाटेल त्याने तोडली. कधी कुरकुर केली नाही किंवा कधी कोणास मनाई केली नाही. परोपकार हा धर्म समजून दुस-यांसाठी जिवन व्यतीत केले. दादा यासंदर्भात एक सुभाषित आठवते का तुम्हाला ?

**छायाम् अन्यस्य कुर्वंति, तिष्ठंती स्वयं आतपे |**
**फलान्यपि परार्थाय, वृक्षा सतपुरूषा इव ||**

एवढे सर्व करून सुध्दा या कृतघ्न व स्वार्थी मानवाने आमच्या फांद्या छाटल्या व जन्मास येणा-या पानांचा, फळा-फुलांचा उमलण्या आधीच जीव घेतला. त्यांची हत्याच केली म्हणाना. यावर कृतघ्नपणाचा कहर करित झाडांच्या मुळावरच ॲसिड टाकून झाडे पण जाळून टाकली.

आता आमचे दिवस संपले. आम्हाला वार्धक्य आले म्हणून वयपरत्वे भुवरी गळून पडलो. ज्या वा-यासंगे, पावसासंगे मैत्री केली त्यांच्या झोताबरोबर प्रवाहाबरोबर वाहत गेलो. एक दिवस असा उजाडणार की, माळी दादा आम्हाला उचलून खड्डयात खत बनविण्यासाठी पुरणार अथवा जाळून टाकणार."

बोलता बोलता त्याचे मन दुःखातिवेगाने भरून आले. पर्णाच्या आणि पन्नाच्या डोळयात आश्रू जमा झाले. बोलण्याचा स्वर रडवेला झाला. एक क्षणाची विश्रांती घेत रडवेल्या करूण स्वरात पर्ण परत पुढे बोलू लागला बोलू लागला." आणि ताई, जर यदाकदाचित जर सुदैवाने त्यांच्या तावडीतून सूटका झालीच तर असेच वाहत जाणार व पायदळी तुडणार. झाले, संपले आमचे जीवन." हे वाक्य संपताच पर्ण व पन्ना उभयजण रडू लागले.

पर्ण व पन्नाच्या जीवनाची करूण कहाणी ऐकून दादा व ताईचा कंठ दाटून आला. ताई म्हणाल्या " नको रे असा कठोर बोलू. आमच्या काळजाला छिद्र पडायला लागलीत बघ."

त्याच्या या बोलण्यावर निर्मला ताईंना भुतकाळ आठवला व सद्य कौटुंबिक स्थितीची जाणीव झाली. त्या अंर्तमुख होउन विचार करू लागल्या. पर्ण आणि पन्नाने आपले आयुष्य समाज सेवेसाठी खर्च केले. तरी पण शेवटी त्यांच्या उतार वयात पदरी निराशा व हाल अपेष्टाच आल्यात ना !

तसे पाहिले तर आपले तरी काय वेगळे थोडीच आहे? चांगला भरलेला सर्व संपन्ना सुखी संसार आहे. दोन मुले, सुना, नातु आहेत. आमच्या 'हम दो और हमारे दो' या चौकोनी संसारात मुलांसाठी तरूणपणी अनेक यातना सहन केल्या. कष्ट घेतले. त्यांच्या वर सुसंस्कार करित शिक्षण दिले. त्यांची लग्ने करून दिलीत. चौकोनी संसारात दोन कोन वाढले. षटकोनी संसार झाला आणि दुर्दैवाने कौंटुबिक सुखाला पारखे झाले. सुनांच्या बदललेल्या मानसिकते मुळे एकत्र कुटुंबाची विभागणी झाली. तीन विभक्त कुटुंबे बनली. कधी भेट नाही की, साधी विचारपूस नाही. भेटण्यासाठी जावे म्हटले तर म्हणतात, 'आधी फोन करून या'. या उतार वयात आर्थिक, सामाजिक व शारिरिक दृष्टया सुदृढ व स्वावलंबी असून देखिल आमच्या पदरी तरी काय पडले? तर अनाथा सारखे एकाकी जिवन जगणे.

निर्मलाताईच्या डोळयात न कळत अश्रू तरारले. ही गोष्ट गोपाळरावांच्या लक्षात आली. त्यांची समजूत काढीत ते म्हणाले "अगं जाऊ दे ! एवढा काय विचार करतेस? हे पण दिवस निघून जातील. ही नविन पीढी. त्यांचे विचार वेगळे, आपले वेगळे. यालाच दोन पिढयातील अंतर म्हणतात. येतील एक दिवस आपली आठवण झाली म्हणजे, शेवटी आपलीच मुले आहेत. माणसाने आशावादी असावं."

असा संवाद चालू असतांना एक वा-याची मंद झुळुक आली. पर्ण व पन्ना ही गळतीची पाने त्यांच्या हातातून केव्हां गळून पडलीत व इतर पानांमध्ये मिसळली ते त्यांना कळलेच नाही. ती गळतीची पानं शोधण्याचा उभयांनी बराच प्रयत्न केला पण अपयशी ठरले.

एव्हाना सांज झाली. सूर्य मावळतीला गेला. तिमीर दाटायला लागला व पृथ्वीतळावर आपला कब्जा करू लागला. पाखरे घरटी परतली. बागेतील सर्वजण आपल्या मार्गाला लागले. बाग बंद होण्याची वेळ झाली. नाईलाजाने गोपाळराव व निर्मलाताईंनी पण घरचा रस्ता धरला.